/उस्मानाबाद /बीड /नांदेड ✦ शनिवार दि.१५ ऑक्टोबर २०२२ ✦ वर्ष ५१ वे ✦ अंक- १० ✦ पृष्ठे८ ✦ किंमत २रुपया ✦ RNINO 39934/83 ✦ OMD-426/2020-22 ✦

# देगलूर महाविद्यालयात आरोग्य समुपदेशन शिबीर संपन्न




देगलूर(प्रतिनिधी):अडत व्यापारी शिक्षण संस्था संचालित देगलूर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने माता सुरक्षित तर घर सुरक्षित या अभियानाच्या अंतर्गत विद्यार्थिनींना आरोग्य मार्गदर्शन कार्यक्रम (समुपदेश कॅम्प ) घेण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार उपस्थित होते. कार्यक्रमाचे मार्गदर्शक म्हणून उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. शिवशंकर बलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य कर्मचारी सौ. छाया पाटील(NCD विभाग), कु. जयश्री बाबळे(सिकलसेल विभाग), रमेश जाधव शिवप्रसाद दामेकर(फिवर क्लिनिक),दीपक सुरेवाड(कोविड लसीकरण विभाग) ह्या उपजिल्हा रुग्णालयातील टीम ने मार्गदर्शन केले.आरोग्य मार्गदर्शन कार्यक्रमात विद्यार्थिनींना आपले आरोग्य कसे सुदृढ ठेवावे यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. व्यंकट खंदकुरे यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेविका मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.सुरेश कासिदे ,प्रा. विनोद काळे, डॉ. व्यंकट खंदकुरे व प्रा.श्रीमती सी .एम. तोंडारे यांनी परिश्रम घेतले.

Scanned with OKEN Scanner